## आदेश नि.क्र.५

(पारीत दि. ०५ माहे मार्च सन २०१६)

०१. वादींनी प्रस्तुत दावा जाहिरनामा व कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता सोबत नि.क्र. ५ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरता दाखल केला.

०२. थोडक्यात वादीचे म्हणणे आहे की, मौजा तेलनडोंगरी, तह. नागभीड, जि. चंद्रपूर येथील भु.क्र. २६ आराजी २.४५ हे.आर. भोगवटदार वर्ग—२ या संपूर्ण जमिनीवर सन २०१० पासून वादीची कब्जे वहिवाट असून त्यातून उत्पन्न घेवून ते त्यावर आपले कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. सदर शेतजमिनीशिवाय वादीजवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदर शेतजमिनीला यापुढे दाव्यातील शेतजमीन संबोधले आहे. पुर्वी ही दाव्यातील जमीन सरकारी मालकीची होती. ती गणू देसाई याला पट्टयाने देण्यात आली होती. परंतु त्याने जमिनीचा वापर न केल्याने ती सरकार जमा करण्यात आली होती. त्यानंतर सन २०१० साली वादीने अतिक्रमण करून उत्पन्न घेणे सुरू केले. आणि एक ते दिड लाख रुपये जमीन तयार करण्यासाठी खर्च केले. वादीचे अतिक्रमणाची नोंद गाव नमुना १—ई मधे आहे. तसेच वनहक्क समिती कोसंबी गवळी यांनी सुद्धा दाव्यातील शेतजमिनीवर वादीची कब्जे वहिवाट असल्याबाबत दाखला दि. १४.१२.२०१० रोजी दिलेला आहे. तसेच दि. २२.७.२०११ रोजी ग्रामपंचायत कोसंबी गवळी यांनी ठराव क्र. ७ नुसार वादीची दाव्यातील शेतजमिनीवर कब्जे वहिवाट असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे दि.१२.०१.२०११ रोजी वादींनी दाव्यातील जमिनीचा पट्टा मिळण्याकरता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे अर्ज केला होता परंतु त्या अर्जाची त्यांनी दखल घेतली नाही. त्यामुळे वादींनी आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दि. ९.२.२०१२ रोजी अर्ज सादर केला. त्याची त्यांनी दखल घेवून दाव्यातील

जमिनीवर पट्टा देण्याचे अर्जाला अनुसरून कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिले. जिल्हाधिकारी यांनी सदरहू मामल्यात चौकशी करण्याचे निर्देश तहसिलदार यांना दिल्याने नायब तहसिलदार, नागभीड यांनी दि.२९.०५.२०१३ रोजी वादी क्र. १ व २ यांचे बयाण नोंदविले व दाव्यातील जमिनीची पाहणी केली. तसा अहवाल तहसिलदार यांनी तयार केला. त्यानुसार सन २०१२–२०१३ या कालावधीत वादिंनी धानाचे उत्पन्न घेतल्याचे व जमीन त्यांचे कब्जात असल्याचे आढळले. दाव्यातील जमीन वादींचे कब्जात असताना व कब्जाबाबत गाव नमुना ई मधे नोंद असताना सुद्धा प्रतिवादी हा माजी सैनिक असल्याने शासकीय योजनेनुसार दि.२१.०४.२०१० रोजी दाव्यातील जमिनीचा पट्टा मिळण्यासाठी त्याने शासनाकडे मागणी केल्याने वादींना कळले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांनी प्रस्ताव तयार करून प्रकरण जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले होते. याबाबत वादींना पुर्वी माहिती नव्हती. परंतु दाव्यातील शेतजमिनीपैकी १.६३ हे.आर. जमीन बेकायदेशीररित्या व नियमाचे पालन न करता व वादींना कोणत्याही प्रकारची सुचना व बाजू मांडण्याची संधी न देता दि. १९.०५.२०१४ रोजी भोगवटदार हक्काने मंजूर करण्यात येत असल्याबाबतचा आदेश पारीत केला. सदर आदेशाविरुद्ध वादीने उपआयुक्त (महसुल) नागपूर विभाग नागपूर यांचेकडे अपील क्र १०/एल.एन.ए./२२/२०१३–१४, दि.२.६.२०१४ रोजी दाखल केले. परंतु दाव्यातील जमिनीवर वादींचा ताबा होता याबाबत अधिकृत दस्ताऐवज वादींनी सादर केले नाही त्यामुळे वादींचे अपील दि.२८.१०.२०१४ रोजी खारीज केली. त्यामुळे वादींनी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. ७३०/२/२०१४ दाखल केली होती परंतु कलम २५७ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमा नुसार पर्यायी दाद मागण्याची सुविधा असल्याने अपील दाखल करण्याची परवानगी दिल्याने वादिंनी महाराष्ट्र राज्य महसुल व वन मंत्रालय यांचेकडे कलम २५७ नुसार दि. १८.२.२०१५ रोजी अपील दाखल केली. ती अपील प्रलंबीत आहे. असे असताना तहसिलदार, नागभीड यांनी

दि. २६.१०.२०१५ चे आदेशानुसार दाव्यातील शेतजमिनीचे कब्जा वहिवाटीला अटकाव करू नये असा बेकायदेशीर आदेश वादींना म्हणणे मांडण्याची संधी न देता पारीत केला. तसेच दि. २६.१०.२०१५ रोजी तलाठी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरीत तहसिलदार यांनी अहवालाची शहानिशा न करता आदेश पारीत केला. त्यामुळे वादी सदर आदेशाविरुद्ध एस.डी.ओ., ब्रम्हपुरी यांचेकडे अपील दाखल करणार आहे. वादींनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दि.२०.०५.२०१५ व २१.०५.२०१५ रोजी नांगरणी, वखरणी करून जून, जुलै महिण्यात धानाची पेरणी केली व धानाचे उत्पन्न कापण्याचे स्थितीत आहे. त्यामुळे काही भागातील धान कापले असून काही बाकी आहे. परंतु प्रतिवादीने दि. १.११.२०१५ रोजी रिपोर्ट दिल्याचे वादींना माहीत झाले. प्रतिवादींनी वादी विरुद्ध खोटा रिपोर्ट दिला. तसेच प्रतिवादी हा नेहमी दस्ताऐवजाचे आधारावर वादिंना दाव्यातील जमीन कब्जात घेण्याची धमकी देत असतो. त्यावेळी दि.३१.१०.२०१५ रोजी प्रतिवादीने दाव्यातील जमिनीतील धान पीक कापून नेईन अशी धमकी दिल्यामुळे आणि वादी हे गरीब असल्यामुळे तसेच प्रतिवादी हा राजकीय क्षेत्राशी संबंध ठेवणारी व्यक्ती असून तो सावकारी करीत असल्याने आर्थिक बळाचे जोरावर वादिंना दाव्यातील शेतजमिनीमधून हुसकावून लावू शकतो. दाव्यातील शेतजमिनीचा प्रत्यक्ष कब्जा राजस्व अधिका–यांनी प्रतिवादीला कधिही दिला नाही. केवळ कागदोपत्री कब्जा दर्शविला आहे. त्यामुळे वादीचे मनात भिती निर्माण झाल्यामुळे त्यांनी प्रस्तुत दावा व अर्ज सादर केला.

०३. प्रतिवादी हा हजर झाला व त्याने नि.क्र. १६ प्रमाणे लेखी बयाण आणि नि.क्र. १७ प्रमाणे लेखी उत्तर दि. १३.१.२०१६ रोजी सादर केले. दाव्यातील शेतजमीन सरकारी आहे, ती शासनाने पट्टयाने गणू देसाईला दिली, नंतर सरकार जमा करण्यात आली, व ती पडीत व सरकारचे नावे असल्याने प्रतिवादीने पट्टा मिळण्याकरता मागणी केली, उपविभागीय अधिकारी,

ब्रम्हपुरी यांनी प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे प्रकरण पाठविले, दि.१९.०५.२०१४ रोजी पट्टा मंजूर झाला. त्याचे आदेशाविरुद्ध वादीने सादर केलेले अपील खारीज केले, त्यानंतर वादीने मुंबई हायकोर्ट यांचेकडे अपील केली होती. त्यानंतर महसुल मंत्रालय, मुंबई येथे अपील दाखल केली व प्रलंबीत आहे, दि.२६.१०.२०१५ रोजी तहसीलदार यांनी कब्जे वहिवाटीला वादिंनी अडथळा करू नये असा आदेश पारीत केला. वादिंनी शेतातील धान चोरून कापून नेल्याने कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये नागभीड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे या सर्व बाबी प्रतिवादीस कबूल आहे. त्याचे म्हणणे आहे की, दाव्यातील शेतजमिनीशिवाय वादीकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही हे खोटे व बनावटी आहे. वादीचे मालकीच्या विविध ठिकाणी शेतजमिनी व जंगम मालमत्ता व ट्रॅक्टर वगैरे आहे. इतर कथन प्रतिवादीने नाकबूल केले. विशेष लेखी बयाणात त्याचे म्हणणे आहे की, त्याचे मालकी व कब्जे वहिवाटीतील मौजा तेलनडोंगरी ता. नागभीड, जि. चंद्रपूर येथे भु.क्र. २६, आराजी २.४५ हे.आर. पैकी १.६३ हे.आर. हक्क सक्षम भुमीधारी, जिची चतु:सिमा पुर्वेस भु.क्र. २९ ची रामकृष्ण हजारेची शेती, पश्चिमेस भु.क्र. २१ ची सरकारी शेती, उत्तरेस भु.क्र. २५ ची हिरामण रंधये यांची शेती आणि दक्षिणेस याच गटापैकी उर्वरीत शेती आहे. सदर शेतजमीन गणू गोसाई मौशी याला ५० वर्षापुर्वी शासनाने पट्टयाने दिली होती परंतु सन २०१० पर्यंत उठीत केली नाही व कोणतेही पिक घेतले नाही. त्यामुळे शेतजमिनीवर येन, गराडी, सेहटा, भाराटी, कुकुडसांजी जातीचे झाडे झुडपे झाले होते. त्यामुळे ती शेतजमीन सरकार जमा करण्यात आली. प्रतिवादी माजी सैनिक असल्याने शासनाचे ध्येयधोरणानुसार माजी सैनिकांना सरकारचे मालकीची पडीत शेती उपयोगाकरीता कायम पट्टयाने मिळण्याकरीता प्रतिवादीची वादी सोबत चांगली मैत्री असल्यामुळे जमीन एप्रील २०१० चे दुस—या आठवडयात पाहण्याकरीता वादिंनी प्रतिवादीला मदत केली. आणि प्रतिवादीने दाव्यातील शेतजमीन पाहणी केली

व संबंधीत तलाठी यांचेशी संपर्क साधून ७/१२ व माहिती घेतली. दि.२१.०४.२०१० रोजी प्रतिवादीने दाव्यातील शेती पट्टयाने मिळण्याकरता उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांचेकडे अर्ज दिला. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार, नागभीड यांना भु.क्र. २६, आराजी २.४५ हे.आर. या जागेची शहानिशा करून अहवाल सादर करण्याचा आदेश दिला. त्यावरून तहसिलदार यांनी संबंधीत अर्जाचे अनुषंगाने कोणाला आक्षेप आहे काय म्हणून जाहिरनामा दि. ३०.०४.२०१० रोजी तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कोसंबी गवळी यांचे कार्यालयात प्रसिद्ध केला. त्यानुसार ग्रामपंचायत कोसंबी गवळी यांनी तसा ठराव घेवून शेतजमीन प्रतिवादीला देण्यास कोणाचा आक्षेप नाही असे कळविले. त्यानंतर तहसिलदार यांनी तलाठी यांना पत्र देवून सदर भु.क्र. २६ या शेतजमिनीवर अतिक्रमण आहे काय म्हणून स्थळ निरीक्षण अहवाल दाखल करण्यास कळविले. त्या अनुषंगाने तलाठी यांनी दि. १३.७.२०१० रोजी भु.क्र. २६ ची मौका चौकशी केलेला अहवाल तहसिलदार नागभीड यांचेकडे सादर केला. आणि सदर शेतजमिनीवर कुणाचेही अतिक्रमण नसल्याबाबत अहवाल दिला. दि. २५.०४.२०११ चे स्थळ निरीक्षण अहवालाचे अनुषंगाने सदर शेतीवर झाडे, झुडपे असून कोणतेही अतिक्रमण नाही, असे कळविले. त्यानंतर तहसिलदार यांनी संबंधीत वनविभागाकडे शहानिशा करण्यास पत्र दिले. त्यांनी मौका चौकशी करून दि. १९.०९.२०११ रोजी अहवाल दिला. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी संबंधीत तहसिलदार, नागभीड यांना स्थळ निरीक्षण करून सुधारीत अहवाल देण्याबद्दल कळविले. त्यावरून तहसिलदार नागभीड यांनी दि. २०.११.२०१३ रोजी भु.क्र. २६ वर कुणाचेही अतिक्रमण नसल्याबाबत सुधारीत अहवाल सादर केला. असे असताना भु.क्र. २६ आराजी २.४५ हे.आर. ही शेतजमीन प्रतिवादी यांना कायदेशीर पट्टयाने मिळणार असल्याने वादीने प्रतिवादीला आम्हाला पट्टयाने शेती मिळवून द्या असे बोलल्यानुसार प्रतिवादीने तुम्ही सरकारी जागेची पट्टयाने मागणी करा नियमात बसेल तर मिळेल असा सल्ला दिला. तेव्हा

वादींनी त्यांचे मित्र खंडाळे याचा भाउ कोतवाल असल्याने वादीला जनार्दन खंडाळे यांनी तुम्ही अतिक्रमण करा पट्टा मिळतो असा बेकायदेशीर सल्ला दिला. जनार्दन खंडाळेशी प्रतिवादीचे राजकीय वैमनस्य असल्याने व आपसात पटत नसल्याने प्रतिवादी विरुद्ध भडकावून खोटे नाटे दस्तऐवज तयार करून प्रतिवादीला सदर जागेचा पट्टा मिळू नये म्हणून अडथळा करण्याचा प्रयत्न निर्माण केला. संबंधीत तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, आयुक्त यांचेकडे तक्रार अर्ज प्रतिवादी विरुद्ध देणे सुरू केले. आणि राजस्व अधिका–यांनी वादीला त्याची बाजू मांडण्याची संधी देवून अपील व तक्रार खारीज केली. आणि मामला क्र. ६/एल.एन.ए./२२/२०१३–१४ दि. १९–५–२०१४ अन्वये भु.क्र. २६ आराजी २.४५ हे.आर. पैकी १.६३ हे.आर. जागा पट्टयावर प्रतिवादीला देण्यात आली. आणि रितसर कार्यवाही करून मोक्यावर १.६३ हे.आर. शेतीचा पंचांसमक्ष ताबा दिला. ताबा पावती दिली. ७/१२ मध्ये फेरफार करण्यात आला. प्रतिवादने ट्रॅक्टरने सदर जमीन उठीत करून धुरे पाळ करून पीक घेण्यायोग्य केली. सदर जमिनीवर प्रतिवादीची मालकी हक्काची कब्जे वहिवाट असून धानाचे पीक घेत आहे. आणि सन २०१५–१६ करता बॅक ऑफ इंडीया यांचेकडून ६०,०००/– रुपयाचे पीक कर्ज घेतले आहे. प्रतिवादीची मालकी हक्काची कब्जा वहिवाट असताना त्याला अडथळा निर्माण करण्याचे उद्देशाने आणि प्रतिवादीशी पटत नसल्याने वादिंनी प्रतिवादीचे भु.क्र. २६, आराजी १.६३ हे.आर. शेतातील धानाचे पीक कापून नेले व त्या अनुषंगाने वादिने दि. २.११.२०१५ रोजी पोलीसात तक्रार दिली. त्यावरून गुन्हा नोंद होवून धान जप्त करण्यात आला. वादिंनी अटकपूर्व जामीन घेतला. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रतिवादीचे कब्जे वहिवाटीतील जमिनीशी वादीचा कोणताही हितसंबंध व कब्जे वहिवाट, अतिक्रमण नसताना प्रतिवादीला विनाकरण आर्थीक व मानसीक नुकसानीत पाडून खोटी केस दाखल केली. त्यामुळे ती रु. २५०००/– नुकसान भरपाई दाखल रक्कम वादीवर बसवून खारीज करावी. वादींनी भु.क्र. २६, आराजी १.६३ हे.आर. या जमिनीचे

पट्टयाला आव्हान दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन यांना पार्टी बनविले नाही. आणि महसुल मंत्रालय, मुंबई व उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना वादीला हा दावा कायदयाने टाकता येत नाही. सबब दावा, अर्ज खारीज करावा

०४. वादी व प्रतिवादीचे परस्पर कथनावरून खालील मुद्दे माझे निर्णयाकरता उद्भवतात.

| | | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १ | | वादी इथे सिद्ध करतात काय की, दावा प्रथमदर्शनी त्यांचे पक्षात आहे ? | | **नकारार्थी** |
| | | | | |
| २ | | वादी इथे सिद्ध करतात काय की, दाव्याचा समतोल त्यांचे पक्षात आहे ? | | **नकारार्थी** |
| | | | | |
| ३ | | वादी इथे सिद्ध करतात काय की, तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश त्यांचे पक्षात न झाल्यास त्यांचे कधिही न भरून निघणारे नुकसान होईल ? | | **नकारार्थी** |
| | | | | |
| ४ | | आदेश काय आहे ? | | अंतीम आदेशाप्रमाणे |

## **का र णे**

०५. मी वादींचे विद्वान अधिवक्ता श्री आर.जी. चौधरी व प्रतिवादीचे विद्वान अधिवक्ता श्री ए.आर. घुटके यांचा सविस्तर युक्तीवाद दि. १.३.२०१६ व दि. २.३.२०१६ रोजी ऐकला आणि कागदपत्रांचे अवलोकन केले.

**मुद्दे क्र. १ ते ३ बाबत :–**

०६. प्रस्तुत प्रकरणात वादीने नि.क्र. ४ यादी प्रमाणे गाव नमुना ई सन २०१३–१४ च्या दोन व २०१४–१५ ची एक प्रत दाखल केली. ज्यानुसार अनुक्रमे वादी क्र. १ चे २.४५ हे.आर. पैकी १.२१ आर. तर वादी

क्र. २ चे १.०० हे.आर. वर दि. ६.८.२०१३ रोजी अतिक्रमण दर्शविले. तसेच दि. १४.८.२०१४ रोजी वादी क्र. १ ते ३ चे अनुक्रमे १.२१, १.०० व ०.४० हे.आर. वर अतिक्रमण दर्शविले. तसेच भु.क्र. २६ आराजी २.४५ हे.आर. चा सन २०१०–११ चा सातबारा दाखल केला. ज्यामध्ये कॉलम १२ मध्ये खरीप व रब्बी हंगाम असे नमुद आहे. दि. २२.७.२०११ रोजीचा ग्रामपंचायत कोसंबी गवळीचा कारवाई अहवाल तसेच दि. १४.१२.२०१० रोजी वन हक्क समिती कोसंबी गवळी यांनी दिलेला दाखला दि. २९.०५.२०१३ रोजी नायब तहसिलदार, नागभीड यांनी मौजा तेलनडोंगरी येथील गट क्र. २६ चे स्थळ निरीक्षण केल्याचा अहवाल. दि. ९.२.२०१३ रोजी कमिश्नर नागपूर यांचेकडे वादी क्र. १ सिताराम यांनी केलेल्या अर्जाची प्रत, तसेच कमिश्नर नागपूर यांचेकडे वादी क्र. २ गौतम राउत यांनी दि. ९.२.२०१२ रोजी केलेल्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. तर यादी नि.क्र. २२ नुसार दि. १६.०२. २०१४ रोजी वादींनी दिवाकर तानबा हजारे, रामकृष्ण तानबा हजारे, दयाराम गणपती रंधये, हिरामण सिताराम रंधये यांचे प्रतिज्ञालेख दाखल केले. दि. ६. ११.२०१५ रोजी तलाठी कोसंबी गवळी यांनी गट क्र. २६ मौजा तेलन डोंगरी चक आराजी १.६३ हे.आर. जमिनीचा फेरफार प्रतिवादीचे नावे घेण्यात आला परंतु ताबा किंवा ताबा पावती देण्यात आल्याचे आढळून आले नाही असा दाखला दिला. यादी नि.क्र. २४ नुसार दि. १.३.२०१६ रोजी वादीने सन २०१४–१५ चा गाव नमुना ई दि. २९.०५.२०१३ चे प्रतिवादी प्रभाकर नारायण लुटे, गणपत सोमाजी ठाकरे यांचे नायब तहसिलदार यांनी घेतलेल्या बयाणाच्या प्रती सादर केल्या. तसेच भु.क्र. २६ चा सन २०१४–१५ चा सातबारा उताराची प्रतिवादीचे नावाची प्रमाणीत प्रत दाखल केली.

०७. या विरुद्ध प्रतिवादीने यादी नि.क्र. २० नुसार एकूण २६ कागदपत्र दाखल केले. त्यामध्ये भु.क्र. २६ चा सन २०११–१२ चा सातबारा उतारा, ज्यामध्ये हंगामाचा रकाना निरंक आहे. तसेच भु.क्र. २६ चा सन

२००९–२०१० चा सातबारा ज्यामध्ये जमीन करणा–याचे नाव सरकार आणि हंगाम निरंक दर्शविले आहे. दि. २१.०४.२०१० रोजी प्रतिवादीने उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांना पट्टयाने जमीन मिळण्याबाबत केलेला अर्ज, दि. ३०.४.२०१० रोजी तहसिलदार, नागभीड यांनी तलाठी कोसंबी गवळी यांना अहवाल सादर करण्याबाबत दिलेले पत्र, दि. ३०.४.२०१० रोजी तहसिलदार, नागभीड यांनी केलेला जाहिरनामा, तहसिलदार नागभीड यांनी रा.मा.क्र. –२/एल.एन.डी.–१९/२००९–१० मध्ये दिलेला अहवाल, दि. ३०.४.२०१० रोजी ग्रामपंचायत कोसंबी गवळी यांनी दिलेला कारवाई अहवाल, दि. १९.७. २०१० रोजीचे सरपंच कोसंबी गवळी यांनी प्रतिवादी व सोमेश्वर नामदेव पडोळे यांना अनुक्रमे भु.क्र. २६ व २७ मौजा तेलनडोंगरी चे पट्टे देण्याबाबत दिलेली नाहरकत, दि. ५.७.२०१० रोजीचे तहसिलदार यांचे पत्रावरून ग्राम पंचायत कोसंबी गवळी यांनी घेतलेला ठराव, ज्यावर तारीख नमुद नाही. तलाठी कोसंबी गवळी यांनी दि. १५.५.२०१० रोजी तहसिलदार नागभीड यांना दिलेला भु.क्र. २६ बाबतचा चौकशी अहवाल. दि. १३.७.२०१० रोजीचा भु. क्र. २६ बाबतचा तलाठी कोसंबी गवळी यांनी दिलेला स्थळ निरीक्षण अहवाल, मोजणी मामला क्र. ७८/२०११ नुसार भु.क्र. २६ चे दि. ५.४. २०११ रोजी करण्यात आलेल्या मोजणीची क प्रत, दि. २५.४.२०११ रोजीचा तहसिलदार यांचा स्थळ निरीक्षण अहवाल, दि. १९.९.२०११ रोजी वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशीक) नागभीड यांचे कार्यालय यांनी भु.क्र. २६ बाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नसल्याबाबत पत्र, तहसिलदार, नागभीड यांनी दिलेला सुधारीत अहवाल, ज्यावर दिनांक नमुद नाही. गाव नमुना एक–ई अतिक्रमण नोंदवही. दि. १९.५.२०१४ रोजी नमुना १८ नुसार प्रतिवादीचे नावे देण्यात आलेला भु.क्र. २६ चा पट्टा. दि. १८.५.२०१५ रोजी प्रतिवादीने तहसिलदार यांना करून दिलेला करारनामा. दि. २५.५.२०१५ रोजीचे तलाठी कोसंबी गवळी यांनी प्रतिवादीला भु.क्र. २६ चा ताबा दिल्याबाबतची ताबा पावती. फेरफार क्र. १११ दि. २०.५.२०१५, भु.क्र. २६

चा सन २०१४—१५ चा सातबारा ज्यानुसार आराजी १.६३ हे.आर. जमीन प्रतिवादीचे मालकीची दर्शविली आहे. दि. २६.१०.२०१५ रोजीचा तहसिलदार, नागभीड यांचा आदेश, ज्यानुसार प्रतिवादीची गट क्र. २६ आराजी १.६३ हे. आर. या पट्टयाने मिळालेल्या शेतजमिनीवर कब्जा वहिवाट असून सुद्धा तलाठी कोसंबी गवळी श्री रंधये यांनी वादी सिताराम बुराडे, गौतम राउत व मारोती दडमल यांचे अतिक्रमण पंजीमध्ये नोंद घेतल्याबाबत ती नोंद रद्द करून वादींनी प्रतिवादीला अडथळा करू नये असा निर्देश देणारा आदेश. वादी गौतम शंकर राउत व सिताराम बुराडे यांनी उपायुक्त महसुल नागपूर विभाग नागपूर यांचेकडे केलेल्या अपीलावर दि. २८.१०.२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत, ज्यानुसार वादींचे अपील खारीज करण्यात आले. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी प्रतिवादीला मंजूर केलेल्या पट्टयाबाबतचा दि. १९. ०५.२०१४ रोजीचा आदेश. दि. २.११.२०१५ रोजी गुन्हा क्र. १२९/२०१५, भा.दं.वि. चे कलम ३७९, ३४ नुसार वादी सिताराम व मारोती यांचे विरुद्ध नोंदविलेला एफ.आय.आर. प्रतिवादीतर्फे हिरामण सिताराम रंदये, गणेश राजेश्वर गड्डमवार यांनी दाखल केलेले शपथपत्र. यादी नि.क्र. २६ नुसार दि. १.३.२०१६ रोजी प्रतिवादीने दाखल केलेले कागदपत्र. दि. २७.१०.२०१५ रोजी तलाठी कोसंबी गवळी यांनी प्रतिवादीचे भु.क्र. २६ पैकी आराजी १.६३ हे.आर. जागेववरील ताब्याबाबत तहसिलदार, नागभीड यांना दिलेले प्रतिवेदन. दि. १.३.२०१६ रोजीचे फोटोग्राफ. वादी सिताराम नामदेव बुराडे याचे नावे मौजा तेलनडोंगरी येथे असलेली भु.क्र. २८ आराजी १.४० हे.आर जमीन दर्शविणारा सातबारा. मौजा तेलनडोंगरी येथील भु.क्र. २१, रामदास मारोती दडमल, चंद्रकला गौतम राउत व इतर यांचे नावाने ०.८७ हे.आर. जमीन दर्शविणारा सातबारा. सचिव ग्राम पंचायत नवेगाव हुंडेश्वरी यांनी दि. १५.४. २०१३ रोजी प्रतिवादीला वादी सिताराम व त्याची पत्नी सिताबाई हल्ली मुक्काम गोवारपेठ हे बि.पी.एल. यादीत समाविष्ट नसल्याबाबत कळविणारे पत्र. वादी सिताराम नामदेव बुराडे याचे नावाचा विटा तयार करण्याबाबतचा

तहसिलदार, नागभीड यांनी दिलेला परवाना सन २०१३–१४.ट्रॅक्टर क्र. एम.एच.–३४–एल ७९२३ वादी सितारामचे नावे असलेले रजिस्ट्रेशन पर्टीकुलर. ट्रॅक्टर क्र. एम.एच.–३४–एल ४६९० वादी सितारामचे नावे असलेले रजिस्ट्रेशन पर्टीकुलर. सौ चंद्रकला गौतम राउत यांनी आदिवासी विविध कार्यकारी संस्था मर्यादीत कोसंबी गवळी यांचेकडून सन २००९–१० तसेच सन २०१०–११ ला घेतलेल्या पीक कर्जाबाबत सभापती व सचीव यांनी दिलेले दि. २०.६.२०१४ रोजीचे पत्र.

०८. तेव्हा वादी व प्रतिवादीचे परस्पर कथन, त्यांनी दाखल केलेले कागदपत्र आणि दोन्ही पक्षांद्वारे सादर करण्यात आलेला युक्तीवाद पाहता इथे प्रथमदर्शनी निदर्शनास येते की, वादी घेवून आलेले कथन की, वादीकडे भु.क्र. २६ शिवाय उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही हे प्रतिवादीनी यादी नि.क्र. २६ सोबत दाखल केलेल्या भु.क्र. २८, २१ चे सातबारा तथा सचिव ग्रामपंचायत हुंडेश्वरी यांनी दिलेले पत्र, वादी क्र. १ चे नावाने असलेला तात्पुरता विटा भट्टीचा परवाना आणि दोन ट्रॅक्टर तसेच चंद्रकला गौतम राउत तसेच वादी क्र. २ ची पत्नी हिने स्वत:चे नावाने घेतलेले पीक कर्ज पाहता वादीकडे दुसरे कोणतेही उत्पनाचे साधन नाही हे इथे प्रथमदर्शनी खोटे ठरते. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले कागदपत्र पाहता गाव नमुना–ई मध्ये तलाठी रंदये यांनी वादींचे नावाने भु.क्र. २६ वरील अतिक्रमणाबाबत घेतलेली नोंद ही प्रथमदर्शनी तहसिलदार यांनी त्यांचे दि. २६.१०.२०१५ रोजीचे आदेशानुसार चुकीची ठरविलेली आहे. आणि भु.क्र. २६, आराजी १.६३ हे.आर. शेतजमिनीवरील प्रतिवादीचे ताब्याला वादींनी अडथळा करू नये असे सुद्धा बजावले आहे. प्रतिवादी घेवून आलेले कथन पाहता त्याचे मते त्याने आणि वादीने प्रस्तुत दाव्यातील जमीन एकत्रीतपणे प्रतिवादीकरता शोधली आणि दि.२१.०४.२०१० रोजी सदर दाव्यातील जमीन पट्टयावर मिळण्याकरता प्रतिवादीने रितसर अर्ज केला. त्यामुळे वादींचे जर अतिक्रमण होते तर त्यांनी

प्रतिवादीला ही जमीन का सुचविली हा प्रश्न निर्माण होतो. आणि प्रतिवादींनी प्रस्तुत जमिनीबाबत अर्ज केल्यानंतर वादींना तर त्याचा मोह सुटला नाही आणि त्यामुळे त्यांनी सुद्धा प्रयत्न करणे सुरू केले आणि त्याचाच भाग म्हणून दि.१४.१२.२०१० चा दाखला व दि. २२.७.२०११ चा ग्रामपंचायत अहवाल त्यांनी मिळविला. आणि वादी क्र. १ व त्याची पत्नी सिताबाई यांनी एकाच वेळी भु.क्र. २६ व २७ वर हक्क सांगणे सुरू केले. वादीचे म्हणणे आहे की, सन २०१० चे अगोदर पासून त्यांचे दाव्यातील जमिनीवर अतिक्रमण होते व त्यांनी त्याबाबत राजस्व अधिका–यांना वारंवार सुचना दिली, अर्ज केले परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. आणि प्रतिवादीने दि. २१.०४.२०१० रोजी अर्ज करताच संपूर्ण यंत्रणा तातडीने कामास लागली. परंतु सन २००७ पासून वादिंनी प्रयत्न केल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र. अभिलेखावर नाही. आणि प्रथम अर्ज दि. ९.२.२०१२ रोजी वादी क्र. २ याने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे केल्याचे दिसते. तसाच अर्ज वादी क्र. १ ने दि. ९.२.२०१३ रोजी केला. म्हणजेच प्रतिवादीने अर्ज केल्यानंतर वादिंनी वाद जमिनीवरील अतिक्रमणाबत हालचाली सुरू केल्या हे कागदपत्रावरून प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

०९. प्रतिवादीचे अर्जानंतर दि. ३०.०४.२०१० रोजीचे तहसिलदार यांचे पत्रानुसार ग्रामपंचायत कोसंबी गवळी यांनी दि. १५.५.२०१० रोजी प्रतिवादीला दाव्यातील जमिनीचा प्टा दयावा म्हणून नाहरकत दिली. दि. १९.०७.२०१० रोजीचे पत्रानुसार सचिवाने ग्रामसभेद्वारे सुद्धा प्रतिवादी व सोमेश्वर पडोळे यांना दाव्यातील जमिनीचा व भु.क्र. २७ चा पट्टा देण्याची शिफारस केली. आणि त्यानंतर त्याच ग्रामपंचायतने दि. २२.०७.२०११ रोजी पूर्णत: विपरीत कारवाई अहवाल दिला. दि. १५.०५.२०१० रोजी तलाठी कोसंबी गवळी यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार दाव्यातील जमिनीवर कोणाचेही अतिक्रमण आढळले नाही. दि. १३.०७.२०१० चे स्थळनिरीक्षणाप्रमाणे त्या जमिनीमध्ये काटेरी झाडे, झुडपे व जमीन पडीत आढळली. दि.२५.०४.२०११ रोजी सुद्धा तहसिलदार

यांना सदर जमीन पूर्णतः पडीत आढळली. आता वादी व प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्राचे अनुषंगाने दि.२२.०७.२०११ पासून वादी व प्रतिवादीमध्ये सदर जमिनीबाबत चढाओढ सुरू झाल्याचे दिसते. दि.२९.०५.२०१३ रोजीचा नायब तहसिलदार डि.डी. खटी यांचा स्थळनिरीक्षण अहवाल पाहता पहिल्यांदा सन २०१२–१३ यावर्षी वादी क्र. १ व २ ने प्रत्येकी ०.३० हे.आर. व वादी क्र. ३ ने ०.१२ हे.आर. दाव्यातील जमिनीवर अतिक्रमण केल्याचे आढळले. परंतु गाव नमुना ई रजिस्टरमधे तेव्हा नोंद आढळली नाही. परंतु सदर स्थळनिरीक्षण अहवाल नायब तहसिलदार, डी.डी. खटी यांनी कोणत्या राजस्व प्रकरणात केला हे स्पष्ट होत नाही. तसेच दि. ९.२.२०१३ आणि ९.२.२०१२ रोजीचे वादी क्र. १ व २ चे अर्जानुसार आयुक्त नागपूर यांनी काय आदेश पारीत केला हे सुद्धा स्पष्ट होत नाही. आणि सदर स्थळ निरीक्षणाचे वेळी हजर असलेले पंच पाहता ते सर्व वादिशी निगडीत असल्याचे दिसते. आणि त्या दिवशी नोंदलेल्या बयाणात प्रतिवादी सुद्धा वादीचे अतिक्रमण कबूल करतो. परंतु त्याचे मते ते सन २०१२–१३ चे असून शासकीय अभिलेखाप्रमाणे कोणाचेही अतिक्रमण नाही. म्हणजेच राजस्व अधिका–यांनीच परस्पर विरोधी अहवाल व नोंदी घेणे सुरू केल्याचे आढळते. या विपरीत तहसिलदार, नागभीड यांचा रा.मा.क्र. २/एल.एन.डी. १९/२००९–१० मधील सुधारीत अहवाल ज्यावर तारीख नमुद नाही. परंतु दि. २०.११.२०१३ अन्वये काढलेल्या त्रुटयांची पुर्तता त्यांनी केली तेव्हा त्यांचे मते प्रस्तावीत जमिनीवर कोणत्याही व्यक्तीचे अतिक्रमण नाही. आणि त्यानंतर प्रतिवादीचे अर्जानुसार संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून दि. १९.५.२०१४ रोजी प्रतिवादीला दाव्यातील जमिनीपैकी १.६३ हे.आर. जमिनीचा पट्टा व दि. २५.०५.२०१५ रोजी ताबा दिल्याचे आढळून येते. आणि या मुद्दयावर वादी क्र. २ व १ ने केलेले अपील उपआयुक्त महसुल, नागपूर विभाग नागपूर यांनी दि. २८.१०.२०१४ रोजीच खारीज केले होते.

१०. आणि प्रतिवादीने दि. १.११.२०१५ रोजी रिपोर्ट वादी क्र. १ व ३ विरुद्ध दाव्यातील जमिनीपैकी प्रतिवादीचे ताब्यातील १.६३ हे.आर. जमिनीमधील धान दि. ३१.१०.२०१५ रोजी वादी क्र. १ व ३ ने त्याअगोदर कापल्याचे प्रतिवादीचे लक्षात आल्याने त्याने दिला. त्यावरून दि. २.११.२०१५ रोजी गुन्हा क्र. १२९/१५, भा.दं.वी.चे कलम ३७९, ३४ प्रमाणे वादी क्र. १ व ३ चे विरुद्ध नोंदविण्यात आला व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सबब वादी व प्रतिवादी हे इरेला पेटून उठले आहेत हे निदर्शनास येते. परंतु राजस्व अभिलेख पाहता प्रतिवादीचे पक्षात दाव्यातील जमिनीची एकूण आराजी २.४५ हे.आर. पैकी १.६३ हे.आर. जमीन पट्टयाद्वारे ताब्यात दि.२५.०५.२०१५ रोजी देण्यात आली आणि उर्वरीत ०.८२ हे.आर. जमीन सरकारचे नावे दर्शविल्याचे वादिंनीच दाखल केलेल्या भु.क्र. २६ चे सन २०१४—१५ चे ७/१२ चे उता—यावरून दिसते. तसेच दि. २५.५.२०१५ रोजी फेरफाराची नोंद सुद्धा रुजु करण्यात आली हे दिसते. आणि एवढा सगळा राजस्व अभिलेख असताना तलाठी कोसंबी गवळी यांनी दि.६.११.२०१५ रोजी प्रतिवादीला भु.क्र. २६ पैकी १.६३ हे.आर. जमिनीचा ताबा किंवा ताबा पावती देण्यात आल्याचे आढळून आले नाही असा दाखला वादिंना राजस्व अभिलेखाचे विरोधात दिला. आणि त्या अगोदर दि. २६.१०.२०१५ रोजी रा.मा.क्र.०५/आर.टी.एस. —६७/२०१५—१६ मधील आदेशानुसार तहसिलदार यांनी सुद्धा तलाठी कोसंबी गवळी यांनी गट क्र. २६, आराजी १.६३ हे.आर. जमिनीवर प्रतिवादीची वहिवाट असताना गै.अ. सिताराम बुराडे, गौतम राउत व मारोती दडमल यांचे नावाची अतिक्रमण पंजीमध्ये नोंद घेतली. आणि ती नोंद तलाठी रंदये यांनी घेतली ती नोंद चुकीची ठरवून वादींनी प्रतिवादीचे ताब्याला अडथळा करू नये अशी ताकीद देवून सुद्धा पुढे धान चोरीचा प्रकार झाल्याचे निदर्शनास येते. आणि दि. १.११.२०१५ रोजी प्रतिवादीने वादी क्र. १ व ३ विरुद्ध रिपोर्ट दिल्यानंतर प्रस्तुत दावा दि. ३.११.२०१५ रोजी न्यायालयात दाखल केल्याचे दिसून येते. सबब परस्पर विरोधी कागदपत्र. पाहता तो

पुराव्याचा भाग ठरतो. परंतु सद्यस्थितीत भु.क्र. २६ मधील १.६३ हे.आर. जमीन प्रतिवादीचे ताब्यात दि. २५.५.२०१५ पासून असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. आणि सदर ताब्याला वादी हे वारंवार अडथळा करून तलाठयाकडून राजस्व अभिलेखा विरुद्ध कागदपत्र प्राप्त करीत आहे हे सुद्धा दिसून येते. त्यामुळे वादींनी त्यांचे पक्षात सादर केलेले प्रतिज्ञालेख इथे संयुक्तीक ठरत नाही. कारण वादी व त्यांचे समर्थक हे वादींना दाव्यातील संपूर्ण जमीन देण्याचे मागे लागले तर राजस्व अभिलेखानुसार भु.क्र. २६, आराजी १.६३ हे.आर. जमीन प्रतिवादीचे कब्जे वहिवाटीत असल्याचे दिसून येते आणि पुन्हा त्याची पुष्टी करणारे प्रतिवेदन दि. २७.१०.२०१५ रोजी श्री आर,एन. पोहनकर तलाठी कोसंबी गवळी यांनी दिले. सबब प्रथमदर्शनी दावा, दाव्याचा समतोल वादीचे पक्षात असल्याचे निदर्शनास येत नाही. आणि वादी हे त्यांचे कडे स्वतःचे मालकीची जमीन व इतर जंगम मालमत्ता असताना सुद्धा स्वतःला भुमीहीन दर्शवून सरकारी जमिनीवर अतिक्रमण करून ती राजस्व अधिका—यांचे निर्णयाविरुद्ध तलाठयाला हाताशी धरून त्यांचा ताबा दर्शविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे इथे वादींचे कोणतेही न भरून निघणारे नुकसान होणार नाही. परंतु प्रतिवादीचे मात्र निश्चितच नुकसान होईल कारण सर्व राजस्व अभिलेखातील कागदपत्रे त्याचे नावे आहे. सबब मी संयुक्तपणे मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) नि.क्र. ५ अर्ज खारीज करण्यात येते.

२) अर्जाचा खर्च दाव्याचे कारणात समाविष्ट करावा.

(जि.व. भेंडे)
दिवाणी न्यायाधिश (क. स्तर)
नागभीड

दि. ०५.०३.२०१६